
जिल्हा परिषद, गडचिरोली
सामान्य प्रशासन विभाग

दुरध्वनी क्र: ०७१३२-२९७४६३ Email :- zpgadmail@gmail.com



क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-१(ब)/अनुकंपा/३९०४ / २०२६ दिनांक :- २८ / १० / २०२६

प्रेस नोट

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत गट-क व गट-ड मधील रिक्त असलेले विविध संवर्गाची पदे अनुकंपाधारक उमेदवारांमधून जेष्ठता, शैक्षणिक अर्हता व सामाजिक प्रवर्गानुसार भरण्याकरीता जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत दिनांक ३१.१२.२०२५ अखेरपर्यंत पूर्ण झालेल्या अनुकंपा प्रकरणाची तपासणी करून पूर्ण माहिती असलेल्या एकूण १९२ उमेदवारांची अंतिम प्रतिक्षासूची तयार करून जिल्हा परिषद, गडचिरोलीच्या **https://zpgadchiroli.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे फलकावर प्रकाशित करण्यात आलेली आहे. या कार्यालयाचे पत्र क्र./जिपग/साप्रवि/आस्था-१(ब)/१५५६/२०२६ दिनांक ०७.०९.२०२६ अन्वये प्रकरण पूर्ण असलेल्या प्रतिक्षाधिन सूचीतील गट-क अनुक्रमांक १ ते १७६ व गट-ड अनुक्रमांक १ ते १६ अनुकंपाधारक उमेदवारांचे दस्तऐवजांची पडताळणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार याव्दारे आवाहन करण्यात येते की, **दिनांक ०२.११.२०२६ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता गट-क व गट-ड च्या पदावर शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती संबंधाने समुपदेश घेण्यात येणार आहे. तरी प्रकरण पूर्ण असलेल्या प्रतिक्षाधिन सूचीतील गट-क अनुक्रमांक १ ते १७६ व गट-ड अनुक्रमांक १ ते १६ पर्यंतच्या उमेदवारांनी मुळ दस्तऐवजासह विर बाबुराव शेडमाके सभागृह, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे समुपदेशनासाठी उपस्थित राहावे.**

प्रतिक्षासूचीतील अनुकंपाधारकांची नेमणूक जेष्ठता, शैक्षणिक अर्हता तसेच सामाजिक प्रवर्गानुसार रिक्त असलेल्या ग्रट-क व गट-ड च्या पदावर समुपदेशन प्रक्रियाव्दारे व पारदर्शकता ठेवून राबविण्यात येणार असल्याने उमेदवारांनी कोणत्याही आमीषाला / भूलथापांना बळी पडू नये असे आवाहन मा. श्री.सुहास गाडे (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी केले आहे. याबाबत कोणीही रक्कमेची मागणी केल्यास किंवा नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवित असल्यास उमेदवारांनी खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर थेट संपर्क साधावा.

१) श्री. सुहास गाडे, (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., गडचिरोली **९४०५२१७८७६**
२) श्री. अनिकेत पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जि.प., गडचिरोली **९७६७५०१५३०**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,
कार्यालय, गडचिरोली.

उपरोक्त प्रेस नोट सर्व दैनिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

(सुहास गाडे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
@ जिल्हा परिषद, गडचिरोली.